सत्यमेव जयते

# लोक आयुक्त कार्यालय

## महाराष्ट्र राज्य

नवीन प्रशासन भवन,
१ला व ३रा मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२
फॅक्स : ०२२-२२०२ ४५४०, दूरध्वनी क्र. : ०२२-२२८५ २९०१ /२२८३ ५६००/२२८२ ४३५८
ई-मेल आयडी : *soadm.lokayukta@maharashtra.gov.in*

संदर्भ : 17906/26 दिनांक : 08 SEP 2026

## जाहीर नोटीस

**लोक आयुक्त कार्यालयाच्या आस्थापनेवरील वाहनचालक या संवर्गातील नियमित १ पद कंत्राटी स्वरुपात भरावयाचे असून त्याकरीता इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.**

१) लोक आयुक्त कार्यालयातील **वाहनचालक संवर्गातील रिक्त पद** वर उल्लेखीलेल्या परिस्थितीत, अकरा महिन्यांच्या कालावधीसाठी **कंत्राटी स्वरुपात** भरण्यात येणार असून सदर पदास नियमित कर्मचाऱ्याचे कोणतेही लाभ अनुज्ञेय नाहीत.

२) कंत्राटी तत्वावर नियुक्त केलेल्या उमेदवारांना दरमहा **रु.३०,०००/-** इतके ठोक वेतन अनुज्ञेय असेल. **ठोक वेतनाव्यतिरिक्त अन्य कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.** गैरहजेरी / अनुपस्थिती कालावधीचे कोणतेही वेतन त्यांना अनुज्ञेय ठरणार नाही. निव्वळ कर्तव्य कालावधीचे वेतनच त्यांना अनुज्ञेय असेल. शिवाय त्यांना कोणत्याही प्रकारच्या रजा अनुज्ञेय ठरणार नाहीत.

३) संबंधित उमेदवाराने वाहन चालक या पदावर कंत्राटी तत्वावर नियुक्ती मिळविण्यासाठी पुढील अर्हता धारण केलेली असली पाहिजे.

**पात्रता:**

(१) तो भारताचा नागरिक असावा.

(२) वयोमर्यादा : उमेदवाराचे वय नेमणूकीच्या वेळी १८ वर्षापेक्षा कमी परंतु, ३८ वर्षापेक्षा अधिक नसावे. मागासवर्गीय व्यक्तीसाठी ४३ वर्षापेक्षा अधिक नसावे. (वयोमर्यादेची गणना — जाहिरात नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास उपरोक्त प्रमाणे नमूद केलेली किमान व कमाल वयोमर्यादा धारण केलेली असणे आवश्यक राहील).

(३) उमेदवाराने शासन मान्यताप्राप्त शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा **(एस.एस.सी)** उत्तीर्ण केलेली असावी.

(४) उमेदवारास मराठी, हिंदी भाषा वाचता, बोलता व इंग्रजी भाषा वाचता येणे आवश्यक आहे.

(५) उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९) मधील तरतुदीनुसार सक्षम अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी दिलेला हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा परवाना धारण केलेला असावा. तसेच मोटार वाहन दुरुस्तीचे जूजबी ज्ञान असणे आवश्यक आहे.

(६) वाहनचालकाकडे चांगली शारीरीक क्षमता असणे आवश्यक आहे. वाहनचालक कोणतीही मादक द्रव्ये किवा अल्कोहोल सेवन करुन वाहन चालविण्याचा किंवा मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) मधील कोणत्याही दखल पात्र अपराधासाठी दोषी सिध्द झालेला नसावा. तसेच वाहनचालकाविरुध्द अपघाताचा गुन्हा दाखल झालेला नसावा.

(७) **नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने नियुक्तीच्या वेळी वाहन चालविण्याची चाचणी उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.**

(८) **अनुभव :** शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी संस्थेमध्ये हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा तीन वर्षाहून कमी नाही इतक्या कालावधीचा अनुभव आवश्यक.

(९) जाहिरातीच्या दिनांकास दोन पेक्षा अधिक अपत्ये हयात असल्यास संबंधित उमेदवार कंत्राटी वाहनचालक या पदासाठी अपात्र राहील.

४) इच्छूक उमेदवारांनी सोबतच्या **जोडपत्र-अ** मध्ये विहित केलेल्या नमून्यात त्यांचे अर्ज मा. प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासन भवन, १ला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालया समोर, मुंबई-४०००३२ यांना उद्देशून **दि. २२/०९/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्रत्यक्ष किंवा रजि.ए.डी/ स्पीड पोस्टामार्फत सादर करावेत. अर्ज ज्या लिफाफ्या मधून सादर करण्यात येतील त्या लिफाफ्यावर "कंत्राटी तत्वावरील वाहनचालक पदासाठी अर्ज" असे ठळकपणे नमूद करणे आवश्यक आहे अन्यथा अर्ज स्वीकारार्ह ठरणार नाहीत. तसेच दि.२१/०९/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वा. नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.** उमेदवारांनी अर्जावर त्यांचे अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र चिकटवावे तसेच अर्जात त्यांचे संपूर्ण नाव, रहिवासी पत्ता, मोबाईल (व्हॉटसअॅप क्रमांक) किंवा दुरध्वनी क्रमांक, अन्य मोबाईल क्रमांक, जन्म दिनांक, शैक्षणिक अर्हता, वाहन चालविण्याचा परवाना, अनुभव इ. तपशील नमूद करून अर्ज स्वस्वाक्षरीसह सादर करावा. अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, ओळख, वय, वाहन चालविण्याचा परवाना तसेच अनुभव इत्यादी माहिती दर्शविणाऱ्या योग्य त्या प्रमाणपत्राच्या स्वयं साक्षांकित प्रतीं जोडाव्यात.

५) प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. तथापि, मुलाखतीकरिता येण्या-जाण्याचा कोणताही खर्च कार्यालयामार्फत दिला जाणार नाही.

६) सदर कंत्राटी नियुक्ती महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम, २०२३ च्या कलम १० अंतर्गत करण्यात येणार असून निवड प्रक्रीये संदर्भातील सर्व अधिकार लोक आयुक्त यांच्या कडे निहित असतील.

**आदेशावरून**

# लोक आयुक्त कार्यालयातील कंत्राटी तत्वावरील वाहनचालक पदासाठी करावयाच्या अर्जाचा नमूना.

येथे उमेदवाराने स्वत:चे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र चिकटवावे

प्रति,
मा. प्रबंधक.
लोक आयुक्त कार्यालय,
नवीन प्रशासन भवन, १ ला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालया समोर, मुंबई-४०००३२

**विषय: कंत्राटी तत्वावरील वाहन चालक पदासाठी अर्ज**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उमेदवाराचे नाव | मराठी | | | | | | | | | |
| | | इंग्रजी | | | | | | | | | |
| २ | जन्म तारीख | | D | D | M | M | Y | Y | Y | Y | |
| ३ | मोबाईल क्रमांक (व्हॉट्सॲप क्र. ) | | | | | | | | | | |
| | संपर्कासाठी अन्य क्रमांक | | | | | | | | | | |
| ४ | आधार क्रमांक | | | | | | | | | | |
| ५ | पॅन क्रमांक | | | | | | | | | | |
| ६ | ई-मेल | | | | | | | | | | |
| ७ | सध्याचा पत्ता | | | | | | | | | | |
| ८ | कायमचा/गावचा पत्ता | | | | | | | | | | |
| ९ | शैक्षणिक अर्हता | दहावी | | | | | | | | | |
| | | बारावी | | | | | | | | | |
| | | पदवी | | | | | | | | | |
| | | पदव्युत्तर | | | | | | | | | |
| | | अन्य | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| १० | वाहन चालविण्याचा परवाना क्रमांक | | | | | | | | | | |
| ११ | ज्ञात असलेल्या भाषा | | | | | | | | | | |
| १२ | हयात अपत्यांची संख्या | | | | | | | | | | |
| १३ | अनुभव | | | | | | | | | | |

| | |
|---|---|
| दिनांक :<br>ठिकाण : | उमेदवाराची स्वाक्षरी |

(अनु. क्र.२,४,५,८,९,१० व १३ येथील माहितीच्या समर्थनार्थ आवश्यक ती स्वसाक्षांकित कागदपत्रे/ प्रमाणपत्रांच्या प्रती सादर कराव्यात.)